In 1960, Theodore Maiman of Hughes Research Laboratories produced the first laser using a ruby crystal as the amplifier and a flashlamp as the energy source. The first gas laser was developed in 1961 by A. Javan, W. Bennet, and H. Harriott of Bell Laboratories, using a mixture of helium and neon gases.

Laser has become a valuable tool in a variety of fields starting with medicine to communications. Laser is a light source but it is very much different from many traditional light sources. Laser is not used for illumination purposes as we use other light sources. Lasers produce a highly directional and high-intensity beam with a narrow frequency range than that available from the common source types of light sources. They are more widely used as a light power electromagnetic beam rather than a light beam. Laser beams are used in the mechanical industry such as a special type of drill bit to drill in hard materials, and cutting materials like wood, glass, ceramics, etc. The laser is also used in the electronics industry such as scribing, soldering, trimming photolithography, etc. Application of lasers in the military involves mainly ranging, guiding weapons to the intended target and laser beam itself acting as a weapon, and so on. Thus, the laser is a high-technology device affecting our lives in many ways.

---

**21.** लेझर हा सामान्य प्रकाश स्रोतांपेक्षा वेगळा आहे कारण ________.

(1) तो उच्च प्रदिप्ती असणारा आहे. (2) तो लघुत्तम वारंवारता श्रेणीत आहे.

(3) तो उच्च दिशा धारक आहे. (4) वरील सर्व बरोबर आहेत.

Laser is different than the common light sources because ________.

(1) It is high intensity beam. (2) It has narrow frequency range.

(3) It is highly directional beam. (4) All of the above are correct.

22. लेझर व अणू किंवा रेणू यांचा काय संबंध आहे ?
(1) लेझर अणू किंवा रेणू शिवाय उत्सर्जित होत नाहीत.
(2) लेझर उत्तेजित किरणोत्सर्गाद्वारे प्रकाशाच्या प्रवर्धनावर आधारित आहेत.
(3) लेझर सूक्ष्मतरंग विकिरीकरणावर आधारित आहेत.
(4) वरीलपैकी नाही.
What is the relation between laser and atoms or molecules ?
(1) Laser did not emit without atom or molecule.
(2) Laser is based on the amplification of light by means of stimulated radiation of atoms or molecules.
(3) Laser is based on microwave radiation.
(4) None of above

---

23. पहिला गॅस लेझर कोणी विकसित केला ?
(1) एच. झेगर
(2) ए. प्रोखोरोव्ह
(3) ए. जावन, डब्ल्यू. बेनेट व एच. हॅरिओट
(4) टाऊन्स बासोव्ह
Who developed first gas Laser ?
(1) H. Zeiger
(2) A. Prokhorov
(3) A. Javan, W. Bennet and H. Harriott
(4) Townes Basov

---

24. लेझर किरण कशासाठी वापरला जात नाही ?
(1) प्रदीपनासाठी (2) काच कापण्यासाठी
(3) शस्त्र म्हणून (4) जाड मटेरीयलला भोकं पाडण्यासाठी
Laser beam is not used for which of the followings ?
(1) Illumination (2) Cutting of glass
(3) As a weapon (4) For drilling holes in thick materials

---

25. लेझर किरणासाठी कोणाला नोबेल पुरस्कार मिळाला आहे ?
(1) बसोव्ह आणि प्रोखोरोव्ह (2) आईनस्टाईन
(3) टाऊन्स, जे. गार्डन (4) एच. हॅरिओट व एच. झेगर
Who got noble prize for Laser ?
(1) Basov and Prokhorov (2) Einstein
(3) Townes, J. Gorden (4) H. Harriott and H. Zeiger

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**खालील उतारा वाचून प्रश्न क्र. 26 ते 30 यांची उत्तरे द्या :**

गेल्या काही शतकांपासून हवामान बदलांमुळे पृथ्वीचे वाढते तापमान, ढगफुटी, वारंवार आढळणारे चक्रीवादळ, दीर्घकाळ व अनियमित हिवाळा व दुष्काळ यासारख्या घटनांनी सार्वजनिक व्यासपीठावर लक्ष वेधले असले तरी अनेक पर्यावरणीय समस्या पृथ्वी द्वारे अनुभवल्या जात आहेत.

या हवामान बदलांमुळे होणाऱ्या टोकाच्या घटनांमुळे मानवासमोर आर्थिक, सामाजिक, व मानसिक स्वास्थाला आव्हान दिले असून त्यावर विचारमंथन करण्यास व व्यक्त होण्यास भाग पाडले आहे. ह्या वास्तविकतेमुळेच हवामान बदलामुळे घडणारे विपरीत परिणाम आटोक्यात आणण्याकरिता अनेक एजन्सीज्/संस्था प्रत्यत्नशिल आहेत.

हे सर्वश्रुतच आहे की जागतिक तापमान वृद्धीसांठी विविध हरित गृह घटकांपैकी ऑटोमोबाईल व तत्सम उद्योगांद्वारे अवाजवी पद्धतीने वातावरणांत उत्सर्जित होणारा/फेकल्या जाणारा कार्बन डायऑक्साईड प्रामुख्याने अत्यंक टोकाच्या हवामान बदलांमुळे होणाऱ्या घटनांसाठी उत्प्रेरक आहे.

पूर्वी नैसर्गिक वने व महासागरांद्वारे वातावरणांतील कार्बन-डायऑक्साईड प्रचुर प्रमाणांत अधिशोषीत/अधिग्रहित केल्या जात असे. (प्रचुर प्रमाणांत शोषल्या जात असे). तथापि वारंवार/सततची होणारी जंगलतोड व महासागराच्या व वनांच्या सभोवताली मानवनिर्मीत वाढत्या दबावांमुळे सदर प्रणालीद्वारे कार्बन पृथक्करण/अधिग्रहीत/करण्याची क्षमता मंदावलेली आहे.

विविध प्रजातींच्या आंतरिक व आपापसांतील संबंध व विशिष्ट पर्यावरणीय परिस्थितीशी घडणाऱ्या परस्पर प्रक्रीयेतून नैसर्गिक वने विकसित होत असतात. आणि हरित गृह वायुंचे होणारे दुष्परिणाम शमविण्यासाठी/आटोक्यांत आणण्याची महत्वाची भूमिका बजावत असतात (शमविण्याचे महत्वाचे कार्य करीत असतात), तसेच ऑक्सीजन निर्मीती सुद्धा करीत असतात. तथापी अन्य वनांच्या/वनक्षेत्रांच्या तुलनेत उष्णकटिबंधीय व "सावन्ना" वनक्षेत्रे जास्त प्रमाणांत प्राणवायूची निर्मिती करतात. अभ्यासांद्वारे प्रस्थापित करण्यात आले आहे की वनक्षेत्रांची (वनांची) नैसर्गिक पुनरुत्पादन क्षमता सततच्या जंगलतोडीमुळे खालावत चालली आहे.

परिस्थितीकी शास्त्रज्ञ असे मत मांडतात की, नैसर्गिक वनांची पुनर्निर्मीती/पुनर्स्थापना करणे हि वैश्वीक तापमान वृद्धीमुळे होणारे दुष्परिणाम आटोक्यात आणण्याकरीता आदर्श प्रणाली ठरू शकते. तथापि नैसर्गिक वनांचे त्यांच्या विशिष्ठ (unique) किंवा उपजत आकृतिबंधानुसार (Zonation Pattern) पुनर्निर्माण किंवा पुनरुज्जीवित करणे अवघड कार्य असुन जणुकांही/जवळपास अशक्यप्राय असे कार्य आहे.

दिवसेंदिवस कमी होणारे वनांचे आवरण/जंगल आवरण विविध सजिव प्रजातींचा ऱ्हास होण्यास कारणीभूत असुन पर्यायाने प्राणवायू निर्मीती व कार्बन साठवणूकीच्या प्रणालीसांठी बाधक ठरतात ज्यामुळे जागतिक तापमान वाढीच्या प्रक्रीयेला चालना मिळते आणि म्हणूनच संशोधक व धोरणकर्ते वृक्षारोपण व वनसंवर्धन उपक्रमांना प्रोत्साहन देतात की जेणेकरुन जागतिक तापमान वृद्धीला शमविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी हातभार लावता येईल.

www.prepp.in



**Read the following passage and answer the questions no. 26 to 30 :**

For the past few centuries Earth has been witnessing several environmental problems even-though the ongoing climate change events such as increasing temperature, cloud bursts, frequent cyclones, long and irregular winters and drought have received more attention in the public platforms.

These extreme climatic events have challenged the physical, mental and economic health of humans and made them to think and speak out. This realisation has been following by several agencies making efforts to mitigate the climate change impacts.

It is known that global warming is the result of the incessant release of greenhouse gases especially carbon dioxide ($CO_2$) from several sectors especially from automobile and associated industries triggering the extreme climatic events.

Earlier the natural forests cover and oceans absorbed the enormous quantities of $CO_2$ released in the environment. However, continuous deforestation and other anthropogenic pressures prevailing in and around the ocean and forest have slowed down the carbon sequestration potential of these systems.

Natural forests evolve due to the constant interplay of inter and intra species alongwith unique environmental conditions and play an important role in mitigating the greenhouse gases to a large extent, also acting as oxygen factories. However, in comparison, tropical and savannah forests produce a more oxygen than other forests.

Studies have established that the natural regeneration potential of the forest has been decreasing due to continuous deforestation.

Ecologists opine that the restoration of natural forests is the ideal way to overcome the global warming impacts However, restoration of natural forest is a herculean task and almost impossible. The diminishing forest cover affects the life-forms and also carbon storage and oxygen production which might speed-up the global warming process, and so researchers and policymakers encourage afforestation programmes in order to mitigate the global warming.

---

26. ''नैसर्गिक वनां'' संबंधित खालील चार विधानांपैकी दोन **योग्य** विधानांची निवड करा.

(a) ''नैसर्गिक वने'' विविध सजिव घटकांच्या (species) व पर्यावरणीय परिस्थितीच्या परस्पर प्रक्रीयेतून निर्मित झालेली आहेत.

(b) ''नैसर्गिक वने'' नद्यांना येणारे पूर व चक्रीवादळासाठी कारणीभूत/जबाबदार आहेत.

(c) ''नैसर्गिक वने'' हरीत गृह वायुंचे वातावरणात उत्सर्जन कमी करण्याचे कार्य करतात.

(d) ''नैसर्गिक वने'' वृक्ष तोडीच्या वाढीसाठी उपयुक्त आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) (2) फक्त (b) व (c) (3) फक्त (a) व (c) (4) फक्त (c) व (d)

Regarding "Natural Forests" four statements are made of which two are correct. Choose the correct option.

(a) "Natural Forests" are formed due to interaction of species and environmental conditions.

(b) "Natural Forests" are responsible for floods and cyclones.

(c) "Natural Forests" play important role in minimizing emission of greenhouse gases in Atmosphere.

(d) "Natural Forests" are important for promotion of tree cutting.

**Answer options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c) (3) Only (a) and (c) (4) Only (c) and (d)

---

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



27. खालील कुठल्या प्रकारची वनक्षेत्रे तुलनेने अधिक प्रमाणात प्राणवायू/ऑक्सीजन निर्मिती करतात ?

(a) उष्णकटिबंधीय जंगले/वने (b) सावन्ना गवताळ वने

(c) पर्वतीय जंगले/वने (d) समशीतोष्ण जंगले/वने

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) (2) फक्त (b) व (c) (3) फक्त (c) व (d) (4) फक्त (b) व (d)

Among the following which type of forest contribute comparatively more production of oxygen ?

(a) Tropical Forests (b) Savannah Grassland

(c) Mountain Forests (d) Temperate Forests

**Answer options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c) (3) Only (c) and (d) (4) Only (b) and (d)

---

28. स्थलीय परिसंस्थेच्या कार्बन पृथक्करण क्षमतेत वाढ करण्यासाठी खालीलपैकी **योग्य** पर्यायांची निवड करा.

(a) वृक्षारोपण करणे व वनीकरण उपक्रम

(b) औद्योगिक सांडपाणी जलस्त्रोतात सोडणे

(c) हरीत गृह वायूंची वाढ

(d) बेकायदेशीर "वृक्ष तोड" थांबविणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) (2) फक्त (b) व (c) (3) फक्त (c) व (d) (4) फक्त (a) व (d)

How the carbon sequestration potential of terrestrial ecosystem can be in increased. Choose correct options among the following.

(a) Planting of trees and Afforestation activities.

(b) Release of industrial wastes in river streams.

(c) Increase in greenhouse gases.

(d) Protecting illegal cutting of trees in forests.

**Answer options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c) (3) Only (c) and (d) (4) Only (a) and (d)

---

www.prepp.in



29. वनसंपदा (वने) व महासागराची कार्बन पृथक्करण (अधिशोषण) क्षमता ढासळत गेली कारण :

(a) वन आवरणात वाढ (b) जंगलतोड

(c) वृक्षारोपण उपक्रम (d) मानवनिर्मित कार्ये

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) (2) फक्त (b) व (d)

(3) फक्त (a) व (c) (4) फक्त (b) व (c)

Carbon sequestration potential of forests and oceans has been decreased due to :

(a) Increase in forest cover (b) Deforestation

(c) Plantation Programme (d) Anthropogenic activities

**Answer options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (d)

(3) Only (a) and (c) (4) Only (b) and (c)

---

30. हरित गृह वायु उत्सर्जित करण्याकरिता खालीलपैकी कोणते दोन पर्याय प्रामुख्याने कारणीभूत आहेत ?

(a) आटोमोबाईल उद्योग (b) श्रेणी जमीन व्यवस्थापन

(c) रासायनिक उद्योग (d) पावसाचे पाणी साठवण

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) (2) फक्त (a) व (c) (3) फक्त (b) व (d) (4) फक्त (b) व (c)

Which of the following two conditions are specially responsible for the emission of greenhouse gases ?

(a) Automobile industries (b) Rangeland Management

(c) Chemical Industries (d) Rainwater harvesting

**Answer options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (a) and (c) (3) Only (b) and (d) (4) Only (b) and (c)

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in



**खालील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 31 ते प्रश्न क्रमांक 35 ची उत्तरे द्या :**

संविधानाच्या भाग III अंतर्गत मूलभूत अधिकारांचे स्वरूप नीटपणे स्थित आहेत. मूलभूत अधिकार नकारात्मक म्हणून विहित केलेले आहेत, जेणेकरून ''राज्यघटनेनेच अशा मर्यादा निर्धारित केल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला असा अधिकार नाकारता येणार नाही''. उपरोक्त सूत्रीकरणाला अपवाद फक्त संविधानाचे कलम 21A आहे, जो एक सकारात्मक अधिकार आहे. 14 वर्षापर्यंतच्या सर्व मुलांना शिक्षणाचा अधिकार प्रदान केला जाईल याची खात्री करण्यासाठी संबंधित सरकारने सक्रिय प्रयत्न करणे आवश्यक आहे. राज्यघटनेच्या 86 व्या दुरुस्ती अन्वये सदर बाब बहाल करण्यात आली. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या सकारात्मक वेगवेगळे परिणाम होतील जे आपल्या संविधानाने दिलेले नाहीत. भिन्न सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी असलेले आणि विकासाच्या भिन्न स्तरावर अस्तित्वात असलेल्या, निहित मानवी हक्कांनी भिन्न भूमिका आणि हेतू स्वीकारले आहेत. भारतीय राज्यघटनेच्या रचनाकारांना अशा सक्रिय कर्तव्याच्या सामाजिक-आर्थिक खर्चासह भारताच्या परिस्थितीची जाणीव होती आणि त्यांनी मूलभूत अधिकारांचा वापर नकारात्मक पद्धतीने प्रतिबंधित करण्याचा सुज्ञ निर्णय घेतला. या महत्वपूर्ण सूत्राचा न्यायालयाने आदर करणे आवश्यक आहे, ज्याने अशा नकारात्मक वापरामागील घटनात्मक नैतिकतेचे समर्थन व्हायला हवेत.

कायदा आणि तंत्रज्ञान क्वचितच तेल आणि पाण्यासारखे मिसळतात. कायद्याचा विकास, तंत्रज्ञानाच्या तुल्यबळ गतीने होत नाही, अशी टीका सातत्याने होत असते. या संदर्भात, आपण हे लक्षात घेतले पाहिजे की कायद्याने तंत्रज्ञानाच्या विकासाला आत्मसात केले पाहिजे आणि त्यानुसार समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्याचे नियम तयार केले पाहिजेत. कायद्याच्या कक्षेत तंत्रज्ञानाची मान्यता न मिळणे, ही एक दुर्दैवी स्थिती आहे. आजच्या काळात, इंटरनेटचे महत्त्व कमी लेखले जाऊ शकत नाही, कारण सकाळ-रात्र, आपण सायबर स्पेसमध्ये गुंतलेले असतो आणि आपले सर्वात मूलभूत क्रियाकलाप इंटरनेटच्या वापराद्वारे पूर्ण केले जातात. इंटरनेटला आता समकालीन महत्व प्राप्त झाले आहे आणि माहिती प्रसाराचे हे एक प्रमुख माध्यम ठरले आहे. त्यामुळे इंटरनेटच्या माध्यमातून भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हे कलम 19(1)(a) चा अविभाज्य भाग आहे आणि त्यानुसार, त्यावर कोणतेही निर्बंध हे घटनेच्या कलम 19(2) अनुसार असले पाहिजेत.

**Read the following passage and answer Questions No. 31 to Question No. 35 :**

The nature of Fundamental Rights under Part III of the Constitution is well settled. The Fundamental Rights are to be understood in a negative context, as in "no person could be denied such right until the Constitution itself prescribes such limitations". The only exception to the aforesaid formulation is Article 21A of the Constitution, which is a positive right that requires an active effort by the concerned Government to ensure that the Right to Education is provided to all children up to the age of 14 years as given by the 86$^{th}$ Constitutional Amendment. The positive prescription of freedom of expression will result in different consequences which our own Constitution has not entered into. Having different social and economic backgrounds and existing on a different scale of development, the application of Human Rights enshrined therein have taken a different role and purpose. The framers of the Indian Constitution were aware of the situation of India, including the socio-economic costs of such proactive duty and hence took an informed decision to restrict the application of Fundamental Rights in a negative manner. This crucial formulation is required to be respected by the Courts, which have to uphold the Constitutional morality behind utilization of such negative prescriptions.

Law and Technology seldom mix like oil and water. There is a consistent criticism that the development of technology is not met by equivalent movement in the Law. In this context, we need to note that the Law should imbibe the technological development and accordingly mould its rules so as to cater to the needs of society. Non recognition of technology within the sphere of Law is only a disservice to the inevitable. In this light, the importance of internet cannot be underestimated, as from morning to night we are encapsulated within the cyberspace and our most basic activities are enabled by the use of internet. Further, the internet has gained contemporary relevance and is one of the major means of information convergence. Therefore, the freedom of speech and expression through the medium of internet is an integral part of Article 19(1)(a) and accordingly, any restriction on the same must be in accordance with Article 19(2) of the Constitution.

www.prepp.in



**31.** प्रगटीकरणाचा अधिकार संविधानाच्या कलम ________ मध्ये दिलेला आहे.

(1) कलम 21(A) (2) कलम 14(4) (3) कलम 25(3) (4) कलम 19(1)(a)

Right of Freedom of Expression is given under Article ________ of the Constitution.

(1) Art. 21(A) (2) Art. 14(4) (3) Art. 25(3) (4) Art. 19(1)(a)

---

**32.** मूलभूत हक्क हे बहुधा नकारात्मक का आहेत ?

(1) मूलभूत हक्क हे सकारात्मक असू शकत नाहीत, अन्यथा लोक त्याचा गैरवापर करू शकतात.

(2) कारण की कोणताही परदेशी नागरीक त्यांचा उपभोग घेऊ शकत नाही.

(3) कारण की संविधान निर्माते यांना त्यामधे लागणाऱ्या उच्चतम खर्चाची कल्पना होती.

(4) कारण की राज्यघटनेच्या कलम 19(2) ची योग्य अंमलबजावणी करता यावी.

Why are the Fundamental Rights mostly negative in nature ?

(1) The Fundamental Rights cannot be positive in nature, otherwise people can misuse them.

(2) The Fundamental Rights are negative in nature, so that no foreigner can enjoy them.

(3) The Fundamental Rights are negative in nature, as the framers of the Constitution were aware of the high costs involved.

(4) So that Art. 19(2) of the Indian Constitution can be properly implemented.

---

**33.** भारतीय संविधानाच्या भाग III मध्ये अभिप्रेत असलेल्या मानवी अधिकारांना वेगळा अर्थ प्राप्त होतो, कारण ________.

(1) भारत UDHR वर स्वाक्षरी करणारा एक देश नाही.

(2) भारतात भरपूर नैसर्गिक साधने उपलब्ध आहे.

(3) भारतात अस्तित्वात असणारी सामाजिक आणि आर्थिक विविधता.

(4) जगातील सर्वात जास्त इंटरनेट वापर करणारे भारतात असल्यामुळे.

Human Rights as enshrined in the Part III of the Constitution of India got different meaning due to :

(1) India is not a signatory to the UDHR.

(2) India being a country with lot of natural resources.

(3) Diverce Socio-economic conditions prevailing in India.

(4) Presence of Largest Internet users of world found in India.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.prepp.in



34. लेखकाच्या मतानुसार, विधी/कायदा क्षेत्राचे परिक्षेत्रामध्ये तंत्रज्ञानाचा वापर व स्विकारार्हता, नाही आहे, याचा अर्थ की :

(1) अस्तित्वात असणाऱ्या सत्य परिस्थिती विचारात घेऊन मान्य न करणे होय.

(2) तंत्रज्ञान कायद्यापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे.

(3) कायदा व तंत्रज्ञान एकत्रपणे अस्तीत्वात राहू शकत नाही.

(4) राज्यघटना तंत्रज्ञानास कायद्याशी एकसंघ होण्यास मान्यता देत नाही.

As per the Author, non-recognition of technology in the sphere of Law means :

(1) This amounts to non-recognizing the existing reality.

(2) This means technology is superior to law.

(3) Law and Technology cannot go together.

(4) Constitution does not permit the blending of technology with law.

---

35. भारतीय राज्यघटनेत शिक्षणाचा अधिकार खालीलपैकी कश्याद्वारे जोडण्यात आला ?

(1) 42 वी घटनादुरुस्ती

(2) 44 वी घटनादुरुस्ती

(3) शिक्षणाचा अधिकार हा मूळ राज्यघटनेचा एक भाग होता

(4) 86 वी घटनादुरुस्ती

The Right to Education was added to the Indian Constitution by which of the following ?

(1) The 42nd Amendment

(2) The 44th Amendment

(3) The Right to education was a part of the original Constitution

(4) The 86th Amendment

---

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



**खालील उतारा वाचून प्रश्न क्र. 36 ते 40 ची उत्तरे द्या :**

भारतीय घटनात्मक लोकशाही आणि कायद्याचे राज्य यांना साठ वर्षे पूर्ण झाली आहेत. खरं तर या निमित्ताने भारतीय घटनात्मक लोकशाहीचा लेखाजोखा मांडण्याची आणि राजकीय लोकशाहीच्या गौरवशाली प्रयोगाची चिकित्सा करण्याची संधी साधणे गरजेचे आहे. घटनाकारांनी एका उदारमतवादी राष्ट्राची स्वप्ने पाहिली आणि त्याच मूल्यांच्या आधारे राष्ट्राची पायाभरणी केली. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आजही आपण उदारमतवादी मूल्यांचे पालन करताना दिसतो. आपल्या शेजारील राष्ट्रांमध्ये मात्र लोकशाही मोडकळीस आलेली दिसते. पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार सारख्या राष्ट्रांमध्ये लोकशाहीपुढे गंभीर आव्हाने आहेत आणि आपल्या उत्तरेला आर्थिकदृष्ट्या समृद्ध पण प्रत्यक्षात हुकूमशाही राजवट असणारा चीन आहे. या सगळ्या राष्ट्रांमध्ये राजकीय अराजकता माजल्याचे आपणास दिसून येते. भारताच्या आसपास असणाऱ्या देशातील वाळवंटरुपी अराजकतेच्या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेमुळे मात्र समाजात अधिकार, प्रतिनिधित्व, न्याय या संकल्पना रूजून नंदनवन फुलून आल्यासारखे वाटते.

राज्यघटनेने प्रजासत्ताकाच्या आराखड्याची यशस्वी निर्मिती केली. घटना समितीतील सदस्य हे तत्कालीन भारतातील सर्वोत्तम राजकीय विचारवंत आणि कायदेपंडित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार पटेल, जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, डॉ. राजेंद्र प्रसाद, के.एम. मुन्शी आणि घटनासल्लागार बी.एन. राव यांच्यासारखे दिग्गज घटना समितीत होते. या सगळ्यांनी उदात्त उद्दिष्ट्ये बाळगून भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली. घटनासमितीचे अथक प्रयत्न आणि दूरदृष्टीमुळेच भारतासारख्या सांस्कृतिक बहुलता असणाऱ्या, आर्थिकदृष्ट्या मागास असणाऱ्या खंडप्राय देशास सर्वोत्तम घटना मिळाली.

आज आपण राज्यघटनेवर टीका करू शकतो, तिच्यातील काही मर्यादांवर चर्चा करू शकतो. आपल्या समाजातील काही समुदाय तर घटनेविषयी अनादर देखील व्यक्त करतात. पण आपण लक्षात घेतले पाहिजे कि हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य देखील घटनेमुळेच मिळालेले आहे. ही घटना नसती तर आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होऊनही सामाजिकदृष्ट्या पारतंत्र्यात राहिलो असतो. भारतीय समाजातील अधिकारशाहीवादी, सरंजामशाही, सांप्रदायिक, लष्करी दडपशाहीचे समर्थक, प्रतिगामी घटक शिरजोर झाले असते.

राज्यघटनेवर आक्षेप घेणारे लोक देखील मान्य करतात की राज्य घटनेच्या तत्वांची अंमलबजावणी करताना प्रत्यक्ष व्यवहारात जरी मर्यादा जाणवल्या तरी कागदावर राज्यघटना सर्वोत्तमच असली पाहिजे. आजच्या घडीला जगातील सर्वोत्तम राज्यघटनांमध्ये भारताची राज्यघटना गणली जाते. अशी घटना आपल्याला प्रदान करणाऱ्या घटनाकारांच्या नैतिक बांधिलकी आणि व्यावहारिक दूरदृष्टीबद्दल आपण कायम कृतज्ञ राहिले पाहिजे.

**Answer question No. 36 to 40 after reading the following passage.**

Sixty years of constitutional democracy and the rule of law in India would seem, on the face of it, like an occasion for taking stock and for celebrating the great Indian political experiment. The founding fathers and mothers put a structure in place, enshrined a nation's dreams in an impressively liberal text, and six decades later, it appears we still abide by that vision. All around us, there are polities in various kinds of malfunction - Pakistan, Afghanistan, Bangladesh, Nepal, Sri Lanka, Myanmar - and to our north, a prosperous but authoritarian China. India's Constitution makes the country an oasis of rights, representation and justice in a desert of failing or otherwise flawed states.

It could be argued that the Constitution, as the textual blueprint of the republic, is not responsible for its own marginalization, violation, or suspension. That it was conceived in a certain era, written in a certain spirit, and promulgated in good faith by the best political and legal minds active in India around the time of independence. That a document first articulated and steered by the likes of Dr. B.R. Ambedkar, Sardar Patel, Jawaharlal Nehru, Maulana Azad, Rajendra Prasad, K.M. Munshi and Constitutional Advisor B.N. Rao, continuously guarded and carefully interpreted by three generations of lawmakers since, is as good as it gets for an overly large, unremittingly poor, vexingly diverse, and precariously free post-colony like India. That we may criticize the Constitution; we may lament its disrespect or point out its inefficacy in many parts of India, but without it, we would still be colonized, if not by the British then by undemocratic, militarist, communal or other sorts of nonprogressive strains within the Indian political spectrum.

Better to have an excellent constitution in the letter if not in practice, than no constitution at all, the objector says. Today the Indian constitution is considered as best amongst all other constitutions. We should be grateful for the moral commitment and practical foresight of our founders.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



36. पुढीलपैकी कोणत्या संकल्पनांमुळे भारतीय लोकशाहीचा प्रयोग यशस्वी झाला असे समजण्यात येते ?

(a) अधिकार
(b) प्रतिनिधीत्व
(c) सांस्कृतिक बहुलता
(d) न्याय

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b)
(2) फक्त (c) आणि (d)
(3) फक्त (a), (b) आणि (d)
(4) वरीलपैकी सर्व

Which of the following concepts can be considered as responsible for success of Indian Democratic experiment ?

(a) Authority
(b) Representation
(c) Cultural Plurality
(d) Justice

**Answer options :**

(1) Only (a) and (b)
(2) Only (c) and (d)
(3) Only (a), (b) and (d)
(4) All of the above

---

37. लोकशाही मोडकळीस आलेल्या राष्ट्रांच्या भूमीचे वर्णन करण्यासाठी कोणता शब्द वापरण्यात आला आहे ?

(1) वाळवंट (2) मरुद्यान (3) नंदनवन (4) अराजकता

Which word has been used to describe the land of nations where democracy is failed ?

(1) Desert (2) Oasis (3) Garden (4) Anarchy

---

38. प्रस्तुत उताऱ्यातील लेखाचे मुख्य प्रयोजन काय आहे ?

(1) राज्यघटनेचे गौरवीकरण करणे.
(2) राज्यघटनेची निंदा करणे.
(3) राज्यघटनेवर टीका करणे.
(4) राज्यघटनेचे महत्व अधोरेखित करणे.

What is the main intention of this presented paragraph ?

(1) To glorify the Constitution.
(2) To Condemn the Constitution.
(3) To criticise the Constitution
(4) To highlight the importance of Constitution

---

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



39. प्रस्तुत उताऱ्यातील 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेत पुढीलपैकी कोणत्या घटकाचा/घटकांचा समावेश आहे ?

(a) संधीची समानता (b) समान वागणूक

(c) न्यायालयांची स्थापना (d) सर्वांसाठी समान कायदा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (b) आणि (d) (3) फक्त (d) (4) फक्त (c)

The term 'Rule of Law' used in this paragraph means which of the following element/elements ?

(a) Equality of opportunity (b) Equal Treatment

(c) Establishment of Courts (d) Equal laws for all

**Answer options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (d) (3) Only (d) (4) Only (c)

---

40. पुढीलपैकी कोणत्या घटकांचा लोकशाहीस असणाऱ्या आव्हानांमध्ये समावेश केला जाऊ शकतो ?

(a) सांप्रदायिकता (b) सरंजामशाही

(c) अधिकारशाही (d) लष्करी दडपशाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) आणि (c) (3) फक्त (a) आणि (c) (4) वरीलपैकी सर्व

Which of the following can be considered as challenges to democracy ?

(a) Communalism (b) Feudalism

(c) Authoritarianism (d) Supression by Military

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) and (c) (3) Only (a) and (c) (4) All of the above

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in



**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्र. 41 ते 45 ची उत्तरे लिहा.**

कलावंताला आपल्या आयुष्यात जे निरनिराळे बरे–वाईट अनुभव येतात, त्यांचा त्याने निर्माण केलेल्या कलेच्या आविष्काराशी जवळचा संबंध असतो, असे म्हणतात. एकदा बर्नार्ड शॉ याला कुणीतरी विचारले, "तुम्ही आपले आत्मचरित्र का लिहीत नाही ?" त्यावर शॉ हसून म्हणाला, "इतकी वर्षे माझ्या लेखनातून मी दुसरे काय करतो आहे मग ?" ज्याच्या साहित्यामधून त्याच्या खासगी जीवनाचा काही मागमूस लागत नाही असा शेक्सपियरसारखा प्रतिभावंत एखादाच. बहुतेक प्रतिभासंपन्न कलावंतांच्या कलेचा त्यांच्या प्रत्यक्ष जीवनानुभवांशी काही ना काही संबंध असतो, असे दिसून येते.

आपल्या चित्रपटांतील रहस्यमयता आणि भयकारकता यांच्या योगाने प्रेक्षकांच्या मनावर विलक्षण ताण आणणारा विख्यात चित्रपट दिग्दर्शक आल्फ्रेड हिचकॉक याने आपल्या चित्रपटांमागील विशिष्ट प्रेरणांचा उगम बालवयात आपल्याला आलेल्या एका भीतिदायक अनुभवात असल्याचे नमूद केले आहे. आल्फ्रेड हिचकॉक पाच वर्षांचा होता त्या वेळी त्याच्या हातून काही क्षुल्लक अपराध घडला. त्याच्या वडिलांनी त्याला जवळच्या पोलीस स्टेशनात धाडले. त्याच्याबरोबर वडिलांनी एक चिठ्ठी दिलेली होती. पोलीस अधिकाऱ्याने ती चिठ्ठी वाचली आणि आल्फ्रेडची एका कोठडीत रवानगी केली. पाच मिनिटांनंतर जेलरने आल्फ्रेडला कोठडीबाहेर काढले आणि त्याला घरी पाठवले. पोलीस अधिकारी म्हणाला, "खोडकर मुलांना आम्ही कशी शिक्षा देतो, कळलं ना तुला ?"

अबोध आणि निरागस अशा बालवयात आलेला हा भयाण अनुभव हिचकॉक पुढे कधीही विसरला नाही. हिचकॉक म्हणे, "मला आत लोटून जेलरने कोठडीचा दरवाजा जेव्हा बंद केला तेव्हाचा तो करकर आवाज, दाराला कडी लावून घेताना वाजलेला खटका आणि कोठडीतला पाच मिनिटांचा तो भीषण एकान्त याने माझ्या मनावर भीतीचा आणि अनिश्चिततेचा जो ताण आला, त्याचा मला नंतर कधीही विसर पडला नाही! माझ्या रहस्यमय चित्रपटांचे मूळ बालवयातल्या त्या अनुभवात दडलेले आहे!"

हिचकॉकने सांगितलेली आणखी एक गोष्टही या संदर्भात फार सूचक आहे. त्याच्या चित्रपटांमधून अनेक भीतिदायक रहस्यमय प्रसंग रंगवलेले असले, तरी प्रत्यक्ष रक्ताची, रक्तपाताची दृश्ये त्यांत क्वचित आढळतात. याचेही मूळ हिचकॉकच्या एका स्वभावविशेषात दडलेले आहे. एके ठिकाणी तो म्हणतो, "मी हॉटेलात गेलो असता शेजारच्या टेबलापाशी बसलेला माणूस उकडलेल्या बटाट्याच्या फोडींवर जेव्हा लालभडक टोमॅटो सॉस हळूहळू ओततो तेव्हा रक्तासारखे ते सॉस सावकाश पसरत जाताना बघून माझ्या अंगावर भीतीचा काटा उभा राहतो. त्या गरीब बिचाऱ्या खाद्यपदार्थाविषयी मला विलक्षण सहानुभूती वाटू लागते. लाल रंगाइतके भय मला दुसरे कशाचेही वाटत नाही!" आपल्या नाटकांमधून स्मशान, आत्महत्या, बालकांची प्रेते यांची भीषण दृश्ये रंगवणारे थोर प्रतिभावंत राम गणेश गडकरी प्रत्यक्षात फार भित्रे होते, असे म्हणतात; त्याची इथे आठवण झाल्याखेरीज राहत नाही!

---

**41.** बर्नार्ड शॉ आत्मचरित्र लिहीत नाही. कारण –

(अ) आपण निर्माण केलेल्या साहित्यकृतीच्या आविष्काराशी आपल्या जीवनाचा काहीच संबंध नसतो.

(ब) आपण निर्माण केलेल्या साहित्यकृतीच्या आविष्काराशी आपल्या जीवनाचा संबंध असतोच.

(क) आत्मचरित्रात लिहिण्यासारखे काहीच नसते.

(ड) खासगी जीवनाचा मागमूसही लोकांसमोर आणावयाचा नसतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ड) बरोबर (2) (अ) व (ब) बरोबर

(3) (ब) बरोबर (4) (ब) व (क) बरोबर

---

www.prepp.in



42. कलावंताला आपल्या आयुष्यात निरनिराळे अनुभव येतात. कारण –
(अ) त्याचा सभोवतालच्या समाजजीवनाशी संबंध असतो.
(ब) तो संवेदनशील नसतो.
(क) त्याला समाजजीवनापासून वेगळे राहता येत नाही.
(ड) त्याने निर्माण केलेल्या कलेच्या आविष्काराशी संबंध असतो.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) व (ब) बरोबर (2) (अ), (ब), (ड) बरोबर
(3) (अ), (क), (ड) बरोबर (4) (अ), (ब), (क) बरोबर

43. आल्फ्रेड हिचकॉकच्या चित्रपटात रहस्यमयता व भयकारकता आढळते. कारण –
(अ) प्रतिभासंपन्नतेचा अभाव
(ब) बालवयातील पोलीस कोठडीतील भयाण अनुभव
(क) पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्याचे क्रूर वागणे
(ड) पोलीस कोठडीचा दरवाजा बंद केल्यानंतरचा भीषण एकांत
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) व (ब) बरोबर (2) (अ) व (ड) बरोबर
(3) (अ) व (क) बरोबर (4) (ब) व (ड) बरोबर

44. कोणाच्या साहित्यामधून त्याच्या खासगी जीवनाचा मागमूसही लागत नाही ?
(अ) शेक्सपियर (ब) बर्नार्ड शॉ (क) आल्फ्रेड हिचकॉक (ड) राम गणेश गडकरी
**पर्यायी उत्तरे :**
(1) (क) व (ड) बरोबर (2) (ब) व (क) बरोबर
(3) (अ) व (ब) बरोबर (4) (अ) बरोबर

45. हिचकॉकच्या चित्रपटात रक्तपाताची दृश्ये क्वचित आढळतात. कारण –
(अ) त्यांना लाल रंगाचे भय वाटते.
(ब) भीतिदायक स्वभाव.
(क) लाल रंग क्रांतीचे प्रतीक म्हणून.
(ड) हॉटेलमध्ये बटाट्याच्या फोडींवर पसरलेले टोमॅटो सॉस पाहून वाटणारी भीती.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) व (क) बरोबर (2) (अ), (ब), (ड) बरोबर
(3) (अ), (ब), (क) बरोबर (4) (क) व (ड) बरोबर

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in



**Read the given passage and answer the questions No. 46 to 50 :**

To avoid the various foolish opinions to which mankind is prone, no superhuman genius is required. A few simple rules will keep you, not from all error, but from silly error.

If the matter is one that can be settled by observation, make the observation yourself. Aristotle could have avoided the mistake of thinking that women have fewer teeth than men, by the simple device of asking Mrs. Aristotle to keep her mouth open while he counted. He did not do so because he thought he knew. Thinking that you know when in fact you don't is a fatal mistake, to which we are all prone. I believe myself that hedgehogs eat black beetles, because I have been told that they do; but if I were writing a book on the habits of hedgehogs, I should not commit myself until I had seen one enjoying this unappetizing diet. Aristotle, however, was less cautious. Ancient and medieval authors knew all about unicorns and salamanders; not one of them thought it necessary to avoid dogmatic statements about them because he had never seen one of them.

Many matters, however, are less easily brought to the test of experience. If, like most of mankind, you have passionate convictions on many such matters, there are ways in which you can make yourself aware of your own bias. If an opinion contrary to your own makes you angry, that is a sign that you are subconsciously aware of having no good reason for thinking as you do. If someone maintains that two and two are five, or that Iceland is on the equator, you feel pity rather than anger, unless you know so little of arithmetic or geography that his opinion shakes your own contrary conviction. The most savage controversies are those about matters as to which there is no good evidence either way. Persecution is used in theology, not in arithmetic, because in arithmetic there is knowledge, but in theology there is only opinion. So whenever you find yourself getting angry about a difference of opinion, be on your guard; you will probably find, on examination, that your belief is going beyond what the evidence warrants.

A good way of riding yourself of certain kinds of dogmatism is to become aware of opinions held in social circles different from your own. When I was young, I lived much outside my own country in France, Germany, Italy, and the United States. I found this very profitable in diminishing the intensity of insular prejudice. If you cannot travel, seek out people with whom you disagree, and read a newspaper belonging to a party that is not yours. If the people and the newspaper seem mad, perverse, and wicked, remind yourself that you seem so to them. In this opinion both parties may be right, but they cannot both be wrong. This reflection should generate a certain caution.

---

46. Which of the statements are true in the context of the given passage ?
    - (a) Hedgehogs do not eat black beetles.
    - (b) Women have fewer teeth than men.
    - (c) Dogmatism is a good thing.
    - (d) The writer lived outside his own country.
    - (e) One should keep oneself away from prejudices.

    **Answer options :**

    (1) (a), (b) and (d) (2) (d) and (e) (3) (a) and (d) (4) (c), (d) and (e)

---

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



**47.** The writer mentions arithmetic and geography because ___________

(a) we should know both subjects to avoid foolish opinions.

(b) these subjects contain many foolish opinions and unnecessary argument.

(c) the two opinions he mentioned earlier have to do with these subjects.

(d) he is expert in these two subjects.

**Answer options :**

(1) (b) and (c) (2) (c) only (3) (a) and (b) (4) (d) and (c)

---

**48.** Choose the correct option/s :

We can avoid foolish opinions by ___________

(a) way of observation.

(b) avoiding fatal mistakes.

(c) checking whether an opposite opinion makes us angry.

(d) by acquainting ourselves of opinions held in different social circles.

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (c) and (d) (3) (a), (c) and (d) (4) (b), (c) and (d)

---

**49.** Match the following :

| | A | | B |
|---|---|---|---|
| (a) | inherently | (i) | unreasonable dislike or preference |
| (b) | dogmatism | (ii) | cruelty |
| (c) | persecution | (iii) | narrow minded |
| (d) | prejudice | (iv) | by its very nature |
| (e) | insular | (v) | authoritarianism |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) | (e) |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (v) | (ii) | (i) | (iii) |
| (2) | (i) | (iv) | (v) | (ii) | (iii) |
| (3) | (iii) | (v) | (ii) | (iv) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) | (v) |

---

**50.** According to the writer ___________.

(a) Intellectuals do not commit mistakes.

(b) Mankind is inclined to commit mistakes.

(c) Mankind is prone to avoid foolish opinions.

(d) Theology contains only opinion.

(e) Knowledge is different from opinion.

**Answer options :**

(1) (a), (c) and (d) (2) (b), (c) and (d) (3) (c), (d) and (e) (4) (b), (d) and (e)

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

51. बांधकामाच्या भोवतीच्या मलब्याच्या सफाईशी संबंधित करारात ठरलेल्या दिवसांत काम पुरे झाले नाही तर विशिष्ट दंडाची तरतूद पुढीलप्रमाणे केलेली आहे. 1 ल्या दिवसासाठी 250 रुपये; 2 ऱ्या दिवसासाठी 310 रुपये; 3 ऱ्या दिवसासाठी 370 रुपये या प्रमाणे. जर ठेकेदाराने 6960 रुपये दंड भरला असेल तर त्याने कामाला केलेल्या विलंबाचे दिवस निवडा.

(1) 10 (2) 11 (3) 12 (4) 13

A contract related to cleaning debris around the construction work, specifies penalty in completion of work beyond certain days as follows : ₹ 250 for 1st day; ₹ 310 for 2nd day; ₹ 370 for the 3rd day and so on. If the contractor pays the fine amount ₹ 6960 then select the number days he delayed the work.

(1) 10 (2) 11 (3) 12 (4) 13

---

52. पुढे एक कृती व त्यानंतर (a) व (b) ही संबंधित तथ्ये दिली आहेत. कृती पूर्ण करण्यासंदर्भात उचित पर्याय निवडा.

अनु, चुनू, कनू आणि निनू एक शर्यत धावले. सर्व मुलांनी एका रेषेपासून एकाच वेळी शर्यतीला सुरुवात केली. पुढील तथ्ये वापरून शर्यत जिंकणारी व्यक्ती निवडा.

(a) चुनूच्या वेगाची दुप्पट, अनूच्या वेगाची तिप्पट आणि निनूच्या वेगाची चौपट सारखी आहे.

(b) जेव्हा जिंकणाऱ्याने शर्यत संपवली तेव्हा अनू, कनू व निनू यांनी धावलेल्या अंतरांची सरासरी ही अनू व कनू यांनी धावलेल्या अंतरांच्या सरासरीइतकी होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) तथ्यांपैकी एक वापरून कृती पूर्ण करता येईल परंतु फक्त अन्य तथ्य वापरून ती पूर्ण करता येणार नाही.

(2) दोन्हीही तथ्ये एकत्र वापरून कृती पूर्ण करता येईल परंतु दोन्हींपैकी कोणतेही एकच तथ्य वापरून ती करता येणार नाही.

(3) दोन्हीपैकी फक्त कोणतेही एक तथ्य वापरून कृती साध्य करता येईल.

(4) दोन्ही तथ्ये एकत्रित विचारात घेऊन कृती पूर्ण करता येणार नाही.

Given below is an action and related facts (a) and (b) are following it. Select the appropriate option with respect to completion of this action.

Anu, Chunu, Kanu and Ninu ran a race. All children start from the same line simultaneously. Using following facts select the person who won the race.

(a) Twice the speed of Chunu, thrice the speed of Anu and four times speed of Ninu are equal.

(b) When winner finished the race the average of the distances ran by Anu, Kanu and Ninu equalled the average distance ran by Anu and Kanu.

**Answer options :**

(1) The activity can be completed using one of the fact alone but cannot be completed by using other fact alone.

(2) The activity can be done by using both the facts together but cannot be done by using either of the facts alone.

(3) The activity can be accomplished by using either of the facts alone.

(4) The activity cannot be completed by using both the facts together.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in



53. वाक्यातील निहित मुख्य कल्पना काय आहे ?

"तासांच्या सरावानंतर, तिने शेवटी पियानोच्या मुखड्यांवर प्रभुत्व मिळविले."

(1) तिला पियानो वाजवणे आवडते.

(2) पियानोचा सराव करणे कठीण आहे.

(3) पियानोचा मुखडा आव्हानात्मक होता.

(4) समर्पणामुळे प्रभुत्व प्राप्त होते.

What is the main idea in the sentence ?

"After hours of practice, she finally mastered the piano piece"

(1) She enjoys playing the piano

(2) Practising the piano is difficult

(3) The piano piece was challenging

(4) Dedication leads to mastery

---

54. सोपे रूप द्या :

$$\frac{4}{7}\sqrt{147} + \frac{3}{8}\sqrt{192} - \frac{1}{5}\sqrt{75}$$

(1) $5\sqrt{5}$ (2) $3\sqrt{5}$ (3) $7\sqrt{7}$ (4) $6\sqrt{3}$

Simplify :

$$\frac{4}{7}\sqrt{147} + \frac{3}{8}\sqrt{192} - \frac{1}{5}\sqrt{75}$$

(1) $5\sqrt{5}$ (2) $3\sqrt{5}$ (3) $7\sqrt{7}$ (4) $6\sqrt{3}$

---

55. युक्तिवाद आणि प्रतिवाद सादर करण्यासाठी प्रेरक निबंधांमध्ये कोणता संस्थात्मक नमुना वापरला जातो ?

(1) समस्या आणि उपाय (2) बिंदू-दर-बिंदू

(3) कारण आणि परिणाम (4) तुलना आणि विषमता

Which organizational pattern is often used in persuasive essays to present arguments and counter arguments ?

(1) Problem and solution (2) Point-by-point

(3) Cause and effect (4) Compare and contrast

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in



56. आफ्रिकेत ज्वारी, बाजरी आणि नाचणी यांची शेती सुमारे 5000-6000 वर्षांपूर्वी सुरू झाली, तर कोडो, सावा आणि वरई ही धान्ये येथेच जन्मली म्हणून त्यांना भारताची वारसा पिके म्हटले जाते. या सहस्रकांदरम्यान भरड पिकांची शरीरवैशिष्ट्ये जलवायूमानासंदर्भात लवचीक तसेच जैविक आणि अजैविक तणाव सहन करण्यासाठी विकसित झाली आहेत. तांदूळ, गहू यासारख्या C3 गट पिकांच्या तुलनेत 'C4' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वनस्पतींच्या गटातील पिके असून ती स्वत:च 500 पटीने उत्क्रांत झाली आहेत. C4 पिकांतील मेसोफिल पेशी आणि आवरणयुक्त गठ्ठा पेशी त्यांना प्रकाशसंश्लेषणदृष्ट्या कार्यक्षम बनवतात. प्रकाश-श्वासोच्छवास प्रक्रियेत ती काहीही गमावत नाहीत. त्यांना जास्त खत किंवा पावसाची गरज नसते. उत्क्रांती प्रक्रियेतून मिळालेली परागकणांची सुपीकता आणि पुनरुत्पादक रचना, उच्च तापमानात तगण्याची क्षमता व त्यांच्याकडे वेगवान दुष्काळ सुटका यंत्रणा आहे. दुष्काळाची शक्यता जाणवताच स्वत:चे जीवनचक्र गतिमान करून C3 पिकांच्या तुलनेत ती चांगले उत्पादन देतात. कालौघात यशस्वीपणे प्रवास करून भरड धान्ये जन्मजात पौष्टिक गुणांनी युक्त आहेत.

पुढील पर्यायांतून वरील माहितीवरून काढलेला विश्वसनीय निष्कर्ष ठरेल असे एक विधान निवडा.

(1) गहू आणि तांदूळ यांचे उत्पादन कमी करणे शक्य नाही कारण ती नगदी पिके म्हणून उत्पादित केली जातात.

(2) जोपर्यंत लोक भरड धान्यांचा अन्नात समावेश करत नाहीत आणि त्यांची चव विकसित करत नाहीत तोपर्यंत भरड पिकांचे व्यवसायिक उत्पादन वाढवणे फायदेशीर ठरणार नाही.

(3) दिलेली भरड पिकांची वैशिष्ट्ये लक्षात घेता त्यांच्या उत्पादनात वाढ केल्यामुळे होणारे प्रदूषण अल्प असेल, कमी गुंतवणूक करून शेतकरी त्यांची पैदास करू शकतील आणि त्यांच्या पोषणमुल्यांमुळे अन्नसुरक्षाही मार्गी लागेल.

(4) गव्हातील ग्लुटेनमुळे त्याच्यापासून चवदार पदार्थ बनवता येतात, मोठी लोकसंख्या ते आवडीने खातात, सवयीचे आहेत आणि खाण्याच्या सवयी सहजासहजी बदलत नाहीत त्यामुळे भरड पिकांचे उत्पादन वाढवणे फायदेशीर ठरणार नाही.

Domestication of sorghum, pearl and finger millets started in Africa some 5000-6000 years ago while kodo, little and barnyard millets originated here and are called the heritage crops of India. When compared to C3 crops like wheat and rice, over these millennia millet physiology evolved to become climate resilient, covering biotic and abiotic stress. Millets belong to the group of plants termed 'C4' crops that are evolved on their own 500 times. Their mesophyll cells and bundle sheath cells make them photosynthetically efficient. They don't have any photo-respiratory loss. Millets don't require much fertiliser or rainfall. One or two irrigations are enough for them. Evolution also added to their pollen fertility and reproductive structure, the ability to withstand high temperatures and they have a mechanism called rapid drought escape. As soon as they sense the possibility of drought, they quicken their life cycle giving better yield compared to C3 crops. Travelling successfully through time, millets have innate nutritional qualities.

Select one of the following statements that can serve as the most reliable conclusion drawn from the above information.

(1) It is not possible to decrease production of wheat and rice as they are produced as cash crops.

(2) Unless people are ready to add millets to their food and develop taste for them increasing millet production commercially will not be profitable.

(3) Considering the given characteristics of millet crops, increasing their production will cause less pollution, farmers can grow them with less investment and their nutritional value will take care of food security.

(4) Gluten in wheat is useful for making tasty food which is enjoyed by large population, they are accustomed to it and one's eating habits are difficult to change therefore increasing millet production will not be profitable.

www.prepp.in



57. दि. 20 मार्च 1995 रोजी सोमवार येतो. 3 नोव्हेंबर 1994 चा दिवस कोणता होता ?

(1) रविवार (2) मंगळवार (3) गुरुवार (4) शुक्रवार

Monday falls on 20th March, 1995. What was the day of 3rd November, 1994 ?

(1) Sunday (2) Tuesday (3) Thursday (4) Friday

---

58. दिलेल्या सहसंबंधातील प्रश्न चिन्हाऐवजी ठेवण्यासाठी उचित प्रतिमा निवडा.



(1)  (2) 

(3)  (4) 

Select the appropriate image for replacing the question mark in given relationship.



(1)  (2) 

(3)  (4) 

3 Nov. 1994 monday.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

20 march, 95 sunday.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



59. एका मुद्दल रकमेवर द.सा.द.शे. 10 टक्के दराने 2 वर्षांचे चक्रवाढ व्याज ₹ 945 होते तर मुद्दलाची रक्कम किती असेल ?

(1) ₹ 4800 (2) ₹ 4700 (3) ₹ 4500 (4) ₹ 4900

What is the principal amount, if the amount of compound interest on it at 10% p.c.p.a. for 2 years is ₹ 945 ?

(1) ₹ 4800 (2) ₹ 4700 (3) ₹ 4500 (4) ₹ 4900

60. 'आटे गावाचे क्षेत्र साटे गावाच्या क्षेत्रापेक्षा मोठे आहे' हा निष्कर्ष नेहमी सत्य ठरवणारी दोन तथ्ये निवडा :

**तथ्ये :**

(a) पाटे गावाचे क्षेत्र वाटे गावाच्या क्षेत्रापेक्षा मोठे आहे.

(b) क्षेत्रासंदर्भात साटे गाव सर्वात लहान नाही.

(c) क्षेत्रासंदर्भात नाटे गावाचा विचार केला नसता तर पाटे गाव सर्वात मोठे ठरले असते.

(d) क्षेत्रासंदर्भात आटे तिसरे मोठे गाव आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) (2) (b), (c) (3) (b), (d) (4) (c), (d)

Identify two facts that prove conclusion : 'the area of village Aate is larger than that of village Sate', to be always true.

**Facts :**

(a) The area of village Pate is larger than that of village Wate.

(b) Sate is not the village smallest with respect to area.

(c) Pate would have been largest with respect to area had it not been for Nate.

(d) Area wise, village Aate, is the third largest.

**Answer options :**

(1) (a), (b) (2) (b), (c) (3) (b), (d) (4) (c), (d)

www.prepp.in



61. "The end of the story" या विधानामध्ये "of" काय निर्देशित करते ?

(1) ताबा (2) स्थान

(3) वेळ (4) संबंध किंवा जोड

In the phrase "The end of the story". What does "of" indicate ?

(1) Possession (2) Location

(3) Time (4) Relationship or connection

---

62. शहराची लोकसंख्या दरवर्षी 5% वाढते. जर सध्याची लोकसंख्या 9261 असेल तर 3 वर्षापूर्वीची लोकसंख्या ______ होती.

(1) 5700 (2) 6000 (3) 7500 (4) 8000

The population of a town increases by 5% every year. If the present population is 9261 then the population 3 years ago was ______.

(1) 5700 (2) 6000 (3) 7500 (4) 8000

---

63. स्थानिक टपरीवर आइस्क्रीम खरेदी करताना मीना व मधू नेहमीच भिन्न चवींचे एकेक असे दोन गोळे घेतात. टपरीवर चॉकलेट, कॉफी, लिची, आंबा, बदाम, स्ट्रॉबेरी आणि व्हॅनिला हे स्वाद उपलब्ध आहेत. मीना बदाम खात नाही आणि मधू चॉकलेट व कॉफी आइस्क्रीम खात नाही.

मधूला उपलब्ध असलेल्या जोड्यांच्या तुलनेत मीनाला निवडीला उपलब्ध असलेल्या अधिक जोड्या दाखवणारी संख्या निवडा.

(1) 4 (2) 5 (3) 6 (4) 7

Whenever Meena and Madhu buy ice creams from the local stall, they both always choose one scoop of each of two different flavours. The flavours available on stall are chocolate, coffee, lichi, mango, almond, strawberry, and vanilla. Meena does not eat almond and Madhu does not eat chocolate or coffee ice cream.

Select number of more combinations that Meena can choose than those of Madhu.

(1) 4 (2) 5 (3) 6 (4) 7

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

cho, coffee, lichi, mango, almond, berry, vanila.

www.prepp.in



64. व्यक्तींच्या सकारात्मक समानानुभूतीच्या परिणामी इतरांच्या उपयोगी पडणे, त्यांना सहकार्य करणे यांचा समावेश असलेली दयेची कामे त्यांच्याकडून घडली असे 2021 च्या हार्वर्ड विद्यापीठाच्या अभ्यासात आढळून आले आहे. यामुळे या व्यक्तींच्या दैनंदिन जीवनात लवचीकता आणि उच्च पातळीच्या समाधानाची जोपासना झाली. समानानुभूती व्युत्पन्न आनंदाचे फायदे प्रचंड असले तरी तो दैनंदिन व्यवहाराचा भाग बनवणे कठीण आहे. मत्सर आणि लोभ आनंदाचे शत्रू आहेत परंतु इतरांच्या त्रासाचा आनंद लुटणाऱ्या व्यक्ती आपल्या भोवती असतात. अनेक प्रसंगी इतरांबद्दलच्या नकारात्मक भावनांमुळे समवयस्कांचे गट तयार होतात सामाजिक व व्यावसायिक गट तयार होतात. क्रिकेटचे चाहते किंवा युद्ध करणारे सैनिक इत्यादी स्वरूपाचे गट यात येतात. यातून दैनंदिन समाजजीवनात विष कालवले जाते. समानानुभूतीच्या अभावी व्यक्ती एकत्रितपणे समाजमाध्यमांचा दुरुपयोग करून इतरांचा आत्मसन्मान खालावण्याचा प्रयत्न करतात.

वरील परिच्छेदाची **सर्वात उचित** मध्यवर्ती कल्पना पुढील पर्यायांतून निवडा.

(1) सकारात्मक समानानुभूतीमुळे व्यक्ती दयेची कामे करतात व परिणामी लवचीकपणे जगत उच्च पातळीचा आनंद अनुभवतात याउलट मत्सर व लोभामुळे व्यक्ती एकत्रितपणे समाजमाध्यमांतून इतरांचे जगणे विषमय करून व त्यांचा आत्मसन्मान खच्ची करून त्याचा आनंद लुटतात.

(2) बहुतेक व्यक्ती एकत्रितपणे समाजात नकारात्मक भावनांचे विष पेरत, समाजमाध्यमांतून इतरांचा आत्मसन्मान खच्ची करणारे साहित्य प्रसारित करून इतरांना होणाऱ्या त्रासाचा आनंद लुटतात.

(3) शाळांतून व्यक्तींना स्वत:ची समानानुभूती विकसित करण्याच्या संधी द्यायला हव्यात तरच त्या इतरांसोबत दयाळूपणे वागतील.

(4) मत्सर आणि मोहात बुडलेल्या व्यक्तींच्या इतरांसंबंधातील नकारात्मक वर्तनामुळे इतरांच्या आत्मसन्मानाचे खच्चीकरण होते.

A Harvard University study of 2021 found that positive empathy propelled kind acts towards others, including being helpful and cooperative. It fostered resilience and a high degree of satisfaction in their daily lives. While the benefits of empathy derived joy are enormous, it is hard to practice. Jealousy and greed are enemies of happiness and we are surrounded by people who enjoy the suffering of others. On many occasions, negative feelings about the other may lead to social and professional bonding amongst peer group, such as amongst cricket fans or soldiers waging war. This poisons our social life. Lack of empathy drive individuals to lower the self-esteem of others through social media.

Select the **most appropriate** central idea of above paragraph from given options.

(1) Persons perform kind acts due to positive empathy and consequently experience high levels of happiness while living flexibly on the contrary jealousy and greed drive individuals to enjoy life by poisoning lives and eroding self-esteem of others through social media.

(2) Most of the people become happy by watching persons suffering the pain by spreading negative emotions in the society and the material through social media that erodes self-esteem of others.

(3) Individuals will be kind toward others only if schools provide them with opportunities to develop their own empathy.

(4) As a result of negative behaviour of persons engulfed in jealousy and greed towards others, self-esteem of others is lowered.

65. कोणता संक्रमण शब्द मागील कल्पनेची निरंतरता सूचित करतो ?

(1) असे असले तरी (2) परिणामी (3) या व्यतिरिक्त (4) शेवटी

Which transition word suggests a continuation of the previous idea ?

(1) Nevertheless (2) Consequently (3) Additionally (4) In conclusion

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



66. जर ' + ' म्हणजे ' − ', ' − ' म्हणजे ' × ', ' ÷ ' म्हणजे ' + ' आणि ' × ' म्हणजे ' ÷ ', तर
$25 \times 5 \div 7 - 4 + 9 = ?$

(1) 39 (2) 24 (3) −35 (4) $\frac{25}{39}$

If ' + ' means ' − ', ' − ' means ' × ', ' ÷ ' means ' + ' and ' × ' means ' ÷ ', then
$25 \times 5 \div 7 - 4 + 9 = ?$

(1) 39 (2) 24 (3) −35 (4) $\frac{25}{39}$

67. दिलेल्या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ निवडा.
"टू पीक अ बोन वुईथ वन"

(1) शिकणे (2) दोष देणे (3) टीका करणे (4) मरणे

Choose the correct meaning of the given idiom.
"To pick a bone with one"

(1) To learn (2) To blame (3) To criticise (4) To die

68. A, B व C या तिघांच्या वाट्याला ₹ 5000, 2 : 3 : 5 या प्रमाणात वाटले तर 'C' च्या वाट्याला किती रुपये येतात ?

(1) ₹ 1500 (2) ₹ 2000 (3) ₹ 2500 (4) ₹ 3000

₹ 5000 has been distributed to A, B and C in the ratio 2 : 3 : 5. How many ₹ comes to 'C' ?

(1) ₹ 1500 (2) ₹ 2000 (3) ₹ 2500 (4) ₹ 3000

69. एक अपराधी समाविष्ट असलेल्या पाच संशयितांची पोलिसांनी चौकशी केली. यातील फक्त तीन व्यक्ती नेहमी खरे बोलणाऱ्या असतील तर अपराधी निवडा.

**अली** : देवने अपराध केला.
**सिन्थिया** : इला निरपराध आहे.
**इला** : बानू खरं बोलतेय.
**बानू** : ती मी नाही.
**देव** : माझ्यावर दोषारोप करताना अली खोटं बोलतोय.

**पर्यायी उत्तरे :**

(1) इला (2) सिन्थिया (3) अली (4) बानू

Five suspects, one of whom is the guilty party, are being interrogated by the police. Select the culprit if just three of the following always speak truth.

**Ali** : Dev Committed the offence.
**Cynthia** : Ela is innocent.
**Ela** : Banu is telling the truth.
**Banu** : It wasn't me.
**Dev** : Ali is lying when he accuses me.

**Answer options :**

(1) Ela (2) Cynthia (3) Ali (4) Banu

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in



70. 3, 4, 7, 8, 9 या अंकांच्या सहाय्याने कोणत्याही संख्येमध्ये अंकाची पुनरावृत्ती न करता किती 2 अंकी संख्या बनवता येतील ?

(1) 30 (2) 31 (3) 25 (4) 20

How many 2 digit numbers can be formed with the digits 3, 4, 7, 8, 9 if none of the digits is being repeated in any of the numbers so formed ?

(1) 30 (2) 31 (3) 25 (4) 20

---

71.

| शाळा | ज्ञानदीप | अंजुमन |
|---|---|---|
| अंतिम शालेय परीक्षा | 65 | 40 |
| पदवी परीक्षा | 40 | 12 |

एकाच वर्षातील दोन शाळांतील विद्यार्थी गटांच्या अंतिम शालेय आणि विद्यापीठ पदवी परीक्षांचे निकाल सोबतच्या सारणीत दिले आहेत. हे निकाल प्रत्येक गटांतील उच्च श्रेणी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या टक्केवारीच्या स्वरूपात व्यक्त केले आहेत. ज्ञानदीप महाविद्यालयाच्या वर्गाचा आकार अंजुमन उच्चपेक्षा लक्षणीयरित्या लहान आहे.

या माहितीवर दोन वृत्तपत्रांनी भिन्न भाष्ये केली :

(a) अंतिम शालेय परीक्षेच्या उत्तम निकालासाठी तयारी करून घेण्यात ज्ञानदीप महाविद्यालय अंजुमन उच्चच्या तुलनेत चांगले आहे.

(b) विद्यापीठ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना तयार करण्यात अंजुमन उच्च, ज्ञानदीप महाविद्यालयाच्या तुलनेत चांगले आहे.

वरील सारणीतील विदेचे विश्वसनीय स्पष्टीकरण करणारे/री भाष्य/ष्ये निवडा.

(1) दोन्ही (a) आणि (b) (2) (a) नाही तसेच (b) ही नाही

(3) फक्त (a) (4) फक्त (b)

| Schools | Dnyandeep | Anjuman |
|---|---|---|
| SEE | 65 | 40 |
| Degree | 40 | 12 |

The examination results of groups of pupils from the same year from two schools in their end-of-school exams and their university degree are given in accompanying table. Results are expressed as percentages of each group achieving the top grades. Dnyandeep College has significantly smaller class sizes than Anjuman Higher.

Two newspapers made different comments on this report :

(a) Dnyadeep College is better than Anjuman Higher at teaching to achieve good results in the end-of-schools exams.

(b) Anjuman Higher prepares pupils better than Dnyandeep College for university education.

Select the comment/s that serve/s as plausible explanation of the data in the table.

(1) Both (a) and (b) (2) Neither (a) nor (b)

(3) Only (a) (4) Only (b)

---

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



72. 

एका गावात इरा 'A' या खुणेने दर्शवलेल्या प्रस्थानकाजवळ राहते आणि 'B' या खुणेने दर्शवलेल्या प्रस्थानकाजवळ काम करते. गावातील रस्त्यांचे सर्व भाग 100 मी. लांबीचे आहेत. इराला कामावर जाताना वेगवेगळ्या मार्गांनी चालायला आवडते परंतु ती सर्वात कमी अंतराचा मार्ग निवडते.

इराला चालता येणाऱ्या विभिन्न मार्गांची संख्या निवडा.

(1) 2 (2) 3 (3) 4 (4) 5



Era lives in a certain village near the junction marked 'A' and works at the junction marked 'B'. All road sections in this village are 100 m long. Era likes to vary her walk to work, but always walks the shortest possible distance.

Select the number of different routes that she can take.

(1) 2 (2) 3 (3) 4 (4) 5

73. 5 भाऊ आणि 3 बहिणींपैकी 1 बहिण आणि 2 भाऊ अशी तीन सदस्यांची समिती स्थापन करायची आहे. ते किती वेगवेगळ्या प्रकारे करता येऊ शकते ?

(1) 30 (2) 25 (3) 20 (4) 15

Out of 5 Brothers and 3 sisters, a committee of 3 members consisting of 1 sister and 2 brothers is to be formed. In how many different ways can it be done ?

(1) 30 (2) 25 (3) 20 (4) 15

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in



74. साधर्म्य असलेला शब्द निवडा :

चंद्रपूर; धुळे; गोंदिया; जळगाव; __?__

(1) नागपूर (2) नंदुरबार (3) नाशिक (4) भुसावळ

Choose the similar word :

Chandrapur; Dhule; Gondia; Jalgaon; __?__

(1) Nagpur (2) Nandurbar (3) Nashik (4) Bhusaval

75. "काल्पनिक कथा वाचल्याने सहानुभूती आणि सामाजिक समज सुधारते." खालीलपैकी कोणते विधान सत्य असल्यास, वरील दाव्याचे जोरदार समर्थन करेल?

(1) अभ्यासातून असे दिसून आले आहे की जे लोक नियमितपणे काल्पनिक कथा वाचतात त्यांना सहानुभूती मोजणाऱ्या चाचण्यांमध्ये जास्त गुण मिळतात.

(2) काल्पनिक साहित्यात अनेकदा जटिल पात्रे आणि परिस्थिती असतात त्यामुळे वाचकांना अनेक दृष्टिकोनांचा विचार करावा लागतो.

(3) जे लोक काल्पनिक कथा वाचतात त्यांच्याकडे न वाचणाऱ्यांच्या तुलनेत जास्त शब्दसंग्रह असतो.

(4) काल्पनिक कथा बहुतेकदा काल्पनिक जगामध्ये रचल्या जातात ज्या वास्तविक जीवनातील अनुभवांशी संबंधित नसतात.

"Reading fiction improves empathy and social understanding." Which of the following statements, if true, would most strongly support the claim above.

(1) Studies have shown that individuals who read fiction regularly have high scores on tests measuring empathy.

(2) Fictional Literature often contains complex characters and situations that require readers to consider multiple perspectives.

(3) People who read fiction tend to have larger vocabularies compared to those who do not.

(4) Fictional stories are often set in imaginative worlds that are unrelated to real-life experiences.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**Decision making and problem solving questions No. 76 to 80 :**

76. तुम्ही बसमध्ये आहात. तुमची बस तुमच्या थांब्यावर पोहोचते पण तरीही तुम्ही प्रचंड गर्दीमुळे तिकीट काढले नाही. तुम्ही काय कराल ?

(1) चालका जवळ पैसे देऊन त्यांना सांगेन की ते वाहकाला द्या.

(2) पेच टाळण्यासाठी पटकन बाहेर उडी मारेन.

(3) वाहकाला बोलावून पैसे देईन व तिकीट घेईन.

(4) वाहकाला देण्यासाठी जवळ बसलेल्या एखाद्याला पैसे देईन.

You are in a bus. The bus reaches your stop but still you have not purchased the ticket because of heavy rush. What will you do ?

(1) Give the money to the driver and tell him to give it to the conductor.

(2) Jump out quickly to avoid embarrassment.

(3) Call the conductor give him the money and get the ticket.

(4) Hand the money to someone sitting nearby to give it to the conductor.

---

77. 2030 अजेंडा साध्य करण्यासाठी शाश्वत विकास साधण्यासाठी शिक्षण हा महत्वाचा घटक आहे. शाश्वत शिक्षण समायोजित करण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पुढाकार स्थानिक पातळीवरून यायला हवा. या अनुषंगाने एक शालेय जिल्हा पर्यावरणीय स्थिरतेवर लक्ष केंद्रित करणारा नवीन अभ्यासक्रम लागू करण्याचा विचार करत आहे.

जिल्हा शिक्षण अधिकारी म्हणून तुम्ही :

(1) नवीन अभ्यासक्रमासाठी अभिप्राय आणि सूचना गोळा करण्यासाठी शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांशी सल्लामसलत कराल.

(2) पर्यावरणीय टिकाऊपणाच्या तत्वांशी संरेखित शिक्षण सामग्री आणि संसाधने विकसित कराल.

(3) नवीन अभ्यासक्रम वितरीत करण्यासाठी शिक्षकांना प्रभावी शिकवण्याच्या धोरणांचे प्रशिक्षण द्याल.

(4) अभ्यासक्रमाची रचना करण्यासाठी निधी निर्माण कराल.

Education is a key factor for achieving sustainable development in order to achieve 2030 Agenda. A signification initiative towards integrating sustainable education should come from local level. In accordance a school district is considering implementing a new curriculum focussed on environmental sustainability.

As a District Educational Authority you will :

(1) Consult with educators, parents and students to gather feedback for new curriculum.

(2) Develop teaching materials and resources aligned with the principles of environmental sustainability.

(3) Train teachers on effective instructional strategies for delivering the New Curriculum.

(4) Generate funds for designing the curriculum.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.prepp.in



78. जलस्रोतांच्या संदर्भातील पाऊलखुणांबाबत अभ्यास करत असताना दुर्दैवाने तुम्हाला मुतखड्याच्या वेदनांना सामोरे जावे लागले. उपचार घेऊन ताकद मिळवण्यासाठी विश्रांती घेत असताना तुमचा एक मित्र तुम्हाला लवकर पूर्ववत होण्याच्या शुभेच्छा देण्यासाठी आला असता त्याने तुम्हाला मूत्रपिंडाच्या त्रासासंबंधाने विस्ताराने माहिती तर दिलीच शिवाय अनेक गावे पिण्याचा पाण्याचा पुरवठा नसल्याने या त्रासाला सामोरे जातात या वस्तुस्थितीची जाणीवही करून दिली. इतके दिवस पाण्याचा अभ्यास करत असून स्वत:लाच स्वत:च्या आजाराच्या मूळ कारणाची माहिती नाही याचे तुम्हाला आश्चर्य वाटले. तुम्ही ...

(1) स्वत:च्या कुटुंबाला खात्रीने पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा होईल अशा ठिकाणी कुटुंबाचे स्थलांतर करण्याचा विचार कराल.

(2) पिण्यायोग्य पाण्याच्या नैसर्गिक व कृत्रिम जलस्रोतांच्या पाण्याच्या गुणवत्तेच्या संवर्धनासंबंधीचा स्वत:चा अभ्यास सुरू ठेवाल आणि सर्वसामान्य लोकांना मुतखड्याच्या त्रासापासून वाचवण्यासाठी कार्य कराल.

(3) परिसरातील सर्व नैसर्गिक व कृत्रिम जलस्रोतांच्या गुणवत्तेबाबत संशोधन करण्यासाठी आणि त्यांची गुणवत्ता कायम राखण्याच्या उपक्रमांत स्थानिक लोकांना सहभागी करून घेण्यासाठी जागतिक व स्थानिक संशोधकांचे व कार्यकर्त्यांचे संघ तयार कराल.

(4) पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करणाऱ्या जलस्रोतांच्या संवर्धनाबाबत लोक उदासीन आहेत हे तथ्य माहित असल्यामुळे कोणत्याही रचनात्मक कार्यासाठी पुढाकार घेणे निरुपयोगी आहे हे लक्षात घेऊन स्वस्थ राहाल.

While studying footprints in the context of water resources, unfortunately you suffered kidney stone pain. A friend of yours came to wish you a speedy recovery while you were resting for regaining your strength. He not only informed you about your kidney problem in detail but also made you aware of the fact that many villages face this problem due to lack of potable drinking water supply. You are surprised that after studying water for so long you do not know the root cause of your own illness. You will ...

(1) think about migrating to any other place where you are sure to get potable water supply to your family.

(2) continue your study for conserving potable natural and manmade water bodies and work for saving people at large from kidney stone suffering.

(3) build up teams of global and local researchers and activists for conducting research related to quality and conservation of all natural and manmade water bodies in the area, and seek participation of local people in conservation programmes.

(4) remain neutral as you are aware of the fact that people care least for conserving water bodies that supply potable water, it is difficult to lead them for any constructive work.

www.prepp.in



79. एका शैक्षणिक संस्थेचे संचालक आहात. तुम्हाला युद्धात भयावहतेपेक्षा मर्दुमकी पाहणाऱ्या आजच्या सार्वजनिक मानसिकतेमध्ये काहीतरी गंभीरपणे चुकते आहे असे वाटते. बहुतेक इतिहासांत युद्धाचा गौरव करण्यात आला आणि त्यासोबत निष्पाप लोकांची हत्या आणि लूट याकडे दोन्ही बाजूंचे नुकसान म्हणून दुर्लक्ष केले गेले. मानवी हक्क केंद्रस्थानी प्रस्थापित करून युद्धाचा उदोउदो करण्याच्या जागतिक दृष्टिकोनाला युरोपियन प्रबोधनाने आव्हान दिले. यामुळे युद्धे संपली नाहीत तसेच त्यांच्यामार्फत होणारा देशभक्तीचा उदोउदोही थांबला नाही. गांधीवादी अहिंसा स्वातंत्र्य चळवळीदरम्यान वसाहतवादी जुलूमशाहीचा नैतिक आणि व्यावहारिक प्रतिकार म्हणून स्वीकारण्यात आली होती पण युद्धाला विरोध व शांतता प्रस्थापनेसाठी विशेष काही केले जात नाही ही तुमची खंत आहे. तुम्ही ...

(1) शाळेच्या ग्रंथालयात संग्रहित केलेल्या जगातील विविध संघर्षांसंबंधाने चर्चा करून संबंधित पक्षांतील दुरावा नाहीसा करण्याचा प्रयत्न करण्याची गरज स्पष्ट करणाऱ्या साहित्याचे वाचन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्याल.

(2) मर्दुमकीच्या, युद्धाच्या, देशभक्तीच्या गोष्टी मुलांच्या मनावर बिंबवल्याखेरीज देशाच्या संरक्षणासाठी सैन्यांत दाखल व्हायला सज्ज असणारे तरुण–तरुणी घडवणे शक्य नाही हे लक्षात घेऊन शांततेचा विचार टाळाल.

(3) अद्ययावत तंत्राच्या साहाय्याने अस्सल ऐतिहासिक दस्तावेज अभ्यासून त्याआधारे इतिहास अभ्यासक्रमांतील विविध संघर्षांचे वर्गात चिकित्सक विश्लेषण करून त्यांच्या समाजावर झालेल्या दीर्घकालीन परिणामांचे आकलन करून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करायला अध्यापकांना प्रोत्साहन द्याल.

(4) 'युद्ध म्हणजे मर्दुमकी नसून स्वत:ला विचारी म्हणवणाऱ्या माणसाचं ते अपयश आहे. मूर्खपणा व क्रौर्य यांचा अनुभव घेणाऱ्या सैनिकासाठी युद्धाचा शेवट विनाशच असतो. त्यामुळे शांतता प्रस्थापित होत नाही' या सत्याचे विद्यार्थ्यांना आकलन करून घ्यायला मदत देण्यासाठी पालक व अध्यापक यांच्या सहभागाने विविध उपक्रम सातत्याने कराल.

Being a director of educational institute you think that something is deeply wrong with today's public psyche that sees glory rather than horror in war. Through most of history war was indeed glorified and the accompanying killing of innocent people and loot was ignored as collateral damage. This world view was challenged by the European Enlightenment that promoted centrality of human rights. This did not end wars or robbed them of patriotic sheen. Gandhian non-violence was adopted as a moral and practical resistance to colonial tyranny during the freedom movement but it is your regret that nothing special is being done to oppose war and establish peace. You will...

(1) encourage students to read literature which explains the need to try to bridge the gap between the parties concerned by discussing the various conflicts in the world that is stocked in school library.

(2) avoid thought of peace, keeping in mind that it is not possible to develop young men and women who are ready to join the army for the defense of the country without impressing the stories of gallantry, war and patriotism on the minds of the children.

(3) encourage teachers to empower students to analyze the various conflicts in history courses in the classroom and to understand the long-term effects on their society by studying authentic historical documents with the help of up-to-date techniques.

(4) assist learners to understand the truth that, 'War is not valor, but the failure of a man who calls himself wise. For a soldier who experiences stupidity and cruelty, war ends in destruction. Peace is not established by it' by organizing various activities continuously with the participation of parents and teachers.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



80. तुमच्या मित्रांना दारू पिणे आवडते आणि तुम्हाला ते मद्यपान करण्यास प्रभावित करत आहेत. जर तुम्हाला त्यांच्या सोबत जायचे नसेल आणि त्यांच्या अल्कोहोल सेवन करण्याच्या सवयी पासून स्वत:ला बाहेर ठेवायचे असेल तर तुम्ही काय कराल ?

(1) मी माझ्या मित्रांना सांगेन की माझ्या पालकांनी मला दारू पिण्यास मनाई केली आहे.

(2) दारू पिण्यास नकार देईन.

(3) फक्त तुमचे मित्र मद्यपान करतात म्हणून मद्यपान करेन.

(4) नकार देईन आणि त्यांना खोटे बोलेल की तुम्हाला यकृताचा आजार आहे.

Your friends like drinking alcohol and influence you to do the same. If you don't want to go with them and to keep yourself away from the habit of drinking alcohol, what would you do ?

(1) I will tell my friends that my parents have forbidden me to drink alcohol.

(2) Will Refuse to drink alcohol.

(3) Will drink alcohol only because your friends are drinking.

(4) Will refuse and lie to them that you have liver disease.

- o O o -

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



**सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**